मुंबई उच्च न्यायालय, (मूळ शाखा) सेवा प्रवेश नियम, २००२ मधील नियम २५ मध्ये झालेल्या सुधारणेनुसार उच्च न्यायालय, (मूळ शाखा), मुंबई अंतर्गत, न्यायालय धारक (Court Receiver) व लेखा अन्वेषण आयुक्त (Commissioner for taking Accounts) या कार्यालयातील सहायक संवर्गाची वेतनश्रेणी दिनांक १.१.१९८६ पासून सुधारित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
विधी व न्याय विभाग
शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण२०१५/प्र.क्र.२४३/ कार्यासन-६
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
दिनांक : ०७ नोव्हेंबर, २०१७

वाचा:-

१. मा. उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई, अधिसूचना, क्र.G/२४१५/१३८, दि. ७ जानेवारी, २०१३
२. मा. उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई, अधिसूचना, क्र.G/२१३९/६२९, दि. १८ ऑगस्ट, २०१६

प्रस्तावना -

उच्च न्यायालय, (मूळ शाखा), मुंबई अंतर्गत कार्यरत असलेल्या कर्मचा-यांच्या पदोन्नती साखळीतील विसंगती दूर करण्याकरिता संदर्भ क्र. १ येथील अधिसूचना दिनांक ७ जानेवारी, २०१३ अन्वये, मुंबई उच्च न्यायालय, (मूळ शाखा) सेवा प्रवेश नियम, २००२ मधील नियम २५ मध्ये सदर अधिसूचना राजपत्रात प्रसिध्द केल्याच्या दिनांकापासून सुधारणा करण्यात आली होती. सदर अधिसूचनेनुसार दिनांक ७ जानेवारी, २०१३ पासून उच्च न्यायालय, (मूळ शाखा), मुंबई अंतर्गत, न्यायालय धारकाच्या (Court Receiver) कार्यालयातील वरिष्ठ लेखापाल-१, निरीक्षक-४, लेखापाल-३, रोखपाल-१ व लेखा अन्वेषण आयुक्त (Commissioner for taking Accounts) या कार्यालयातील रोखपाल-१ अशा एकूण १० पदांचे पदनाम बदलून "सहायक" असे करण्यात आले होते.

तसेच संदर्भ क्र.२ येथील दिनांक १८ऑगस्ट, २०१६च्या अधिसूचनेन्वये सदर दिनांक ७ जानेवारी, २०१३ च्या अधिसूचनेन्वये केलेली सुधारणा दिनांक१.१.१९८६पासून लागू केली आहे. या सुधारणेनुसार, उच्च न्यायालय, (मूळ शाखा), मुंबई अंतर्गत, न्यायालय धारक (Court Receiver), उच्च न्यायालय, मुंबई व लेखा अन्वेषण आयुक्त (Commissioner for taking Accounts) या कार्यालयातील सहायक संवर्गाची वेतनश्रेणी सुधारित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

मुंबई उच्च न्यायालय, (मूळ शाखा) सेवा प्रवेश नियम, २००२ मधील नियम २५ मध्ये केलेल्या सुधारणेनुसार उच्च न्यायालय, (मूळ शाखा), मुंबई अंतर्गत, न्यायालय धारक (Court Receiver), व लेखा अन्वेषण आयुक्त (Commissioner for taking Accounts) या

कार्यालयातील सहायक संवर्गाची वेतनश्रेणी दिनांक १.१.१९८६ पासून खालील विवरणात दर्शविल्याप्रमाणे सुधारित करण्यात येत आहे.

अ. क्र.	**पूर्वीचे पदनाम**	**सुधारित पदनाम**	**वेतनश्रेणी रुपये**		
१	वरिष्ठ लेखापाल	सहायक	**चौथा वेतन आयोग दि. १.१.१९८६ ते दि.३१.१२.१९९५**	**पाचवा वेतन आयोग दि. १.१.१९९६ ते ३१.१२.२००५**	**सहावा वेतन आयोग दि. १.१.२००६ पासून**
२	निरीक्षक		**१६४०-६०-२६००-द.रो.७५-२९००**	**५५००-१७५-९०००**	**९३००-३४८०० ग्रेड वेतन ४३००**
३	लेखापाल				
४	रोखपाल				

२. यावर होणारा खर्च "मागणी क्रमांक जे-१, २०१४, न्यायदान, (दत्तमत) १०२ उच्च न्यायालये (०४) (०१) लेखा अन्वेषण आयुक्त २०१४ ०१७२ व (०७) (०१) न्यायालयधारक व परिसमापक २०१४ ०१४५" या लेखाशिर्षा खाली भागविण्यात यावा.

३. हा शासन निर्णय वित्त विभागाने अनौपचारिक संदर्भ क्रमांक २७२/२०१७/सेवा-९, दिनांक २७.१०.२०१७अन्वये दिलेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७११०७१५४६०५०११२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने सांक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशांनुसार व नावाने,

Jyostna Borkar

Digitally signed by Jyostna Borkar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Law And Judiciary Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=f9a99ca6387db93fd460c58b6a74a5e3c650b410a7e397d26b14d297b7e7029e, serialNumber=48154ced13b666f0e25c26b198bd6c57ca8fb5f995a91696cdcfdccb567f571c, cn=Jyostna Borkar
Date: 2017.11.07 15:34:36 +05'30'

(ज्योत्स्ना बोरकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :-

१. मा. राज्यपालाचे सचिव
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३. सर्व विधानमंडळ सदस्य, विधानमंडळ, मुंबई
४. सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक
५. महाप्रबंधक, उच्च न्यायालय, मुंबई
६. प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा/मुळ शाखा), मुंबई
७. प्रबंधक, उच्च न्यायालय, नागपूर, औरंगाबाद व पणजी खंडपीठ

८. सर्व प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश
९. महालेखापाल- एक (लेखा व अनुज्ञेयता/ लेखापरीक्षा), महाराष्ट्र, मुंबई
१०. महालेखापाल-दोन (लेखापरीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर
११. बहुजन समाज पार्टी, डी-१, इन्सा हटमेंट, आझाद मैदान, मुंबई
१२. भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश, सीडीओ बॅरेक्स क्र.१ योगक्षेमसमोर, वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईंट, मुंबई-४०० ०२१
१३. भारतीय कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र कमिटी,३१४, राज भुवन, एस.व्ही. पटेल रोड, मुंबई-४०० ००४
१४. भारतीय कम्युनिस्ट पार्टी, (मार्क्सवादी) महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस, वरळी, मुंबई-४०० ०१३
१५. इंडियन नॅशनल कॉंग्रेस, महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस(आय) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई४०० ०२५
१६. नॅशनॅलिस्ट कॉंग्रेस पार्टी, राष्ट्रवादी भवन, फ्री प्रेस जर्नल मार्ग,नरिमन पॉईंट, मुंबई-४०० ०२१
१७. शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई-४०० ०२८
१८. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
१९. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
२०. निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई
२१. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
२२. सर्व लेखाधिकारी, वेतन पडताळणी पथक, मुंबई/नागपूर/पुणे/औरंगाबाद
२३. वित्त विभाग (व्यय-५, सेवा-९), मंत्रालय, मुंबई
२४. विधी व न्याय विभाग कार्यासन-२३,२४ व २५
२५. निवड नस्ती, विधि व न्याय विभाग, कार्यासन-६.